## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जावक क्रमांक /अं.न.प./नरवि/बां.प./१०-११/९६४३ १९९८/८५
अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय,
अंबरनाथ. दिनांक : 29/2/2011

प्रति,
श्री.रघुनाथ लक्ष्मण नवरे व इतर चार निर्मलाबाई नाना पाटील व इतर सहा
श्रीम.सिताबाई नाथा पाटील व इतर, भरत नारायण पाटील व इतर अकरा,
व श्री.विलास एस.पाटील व इतर यांचे कु.मु.व.धा.मे.एमटू रियलटर्स एल.एल.पी.कंपनी,
यांचे भागीदार श्री.जितेंद्र मोहनदास लालचंदानी व इतर
द्वारा - थोरात अँण्ड मॅथ्यू असो. वास्तुशिल्पकार,अंबरनाथ
विषय : मौजे कोहोज खुंटवली अंबरनाथ,स.क्र.१७८,३१/२,३६/१५,३७,२५/१२,३६/६ ते ३६/१४,३६/१६ पैकी,३५/२,३६/३,२५/१४ पैकी,२५/१ पैकी बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.
संदर्भ : आपला दि. ६ /१२ /२०१० चा अर्ज क्र. १०२८

द्वारा - थोरात अँण्ड मॅथ्यू असो. वास्तुशिल्पकार,अंबरनाथ
यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

मौजे कोहोज, खुंटवली अंबरनाथ,स.क्र.१७८,३१/२,३६/१५,३७,२५/१२,३६/६ ते ३६/१४,३६/१६ पैकी,३५/२,३६/३,२५/१४ पैकी,२५/१ पैकी मध्ये- ६४१४१.२५ चौ.मी. भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि.१६/११/२०१० च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळघर/स्टील्ट, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा,पाचवा,सहावा,सातवा,मजला व रो हाऊसेस राहाणेसाठी इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे.

-: अटी : -

१. हा बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुशंगाने छाननी करण्यात येईल.
२. नकाशात ......हिरव्या...... रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३. मे.जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.
४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
६. बांधकाम सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि चालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल.जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.
७. भूखंडाचे हद्दीत सोडलेली मोकळी जागा/सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
८. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.
९. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.